# जिल्हाधिकारी (भुसंपादन शाखा) नाशिक
# (उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) क्र.२ नाशिक

## अधिसुचना

## भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा अणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 19

---

जिल्हाधिकारी नाशिक, जिल्हा नाशिक यांचे कार्यालय

दिनांक:-

**क्रमांक- भुस/ कक्ष/10/3/कावि/** 15 **/18 दिनांक** 10 /01/2018

ज्या अर्थी, समुचित शासन असलेल्या नाशिक जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याने, भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम ,2013 (2013 चा 30) (यात या पुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे.) यांच्या कलम 11 च्या पोटकलम (1) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अधिसुचना क्रमांक---लागु नाही. प्रकरणास महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनिमय 1966 अन्वये प्रारंभिक अधिसुचना क्र. टी.पी.एस 1193/2124/सि.आर- 126/ 95/ यु-डी 9 दिनांक 19.2.1996 रोजी काढली आहे, आणि त्याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, या सोबत जोडलेल्या अनुसुची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्या अर्थी, नाशिक जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांनी, कलम 15 च्या पोटकलम (2) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिन संपादित करण्याची आवश्यकता आहे या बाबत त्याची खात्री पटली आहे. आणि म्हणुन उक्त अधिनियमाच्या कलम 19 च्या पोटकलम (1) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषीत करण्यात येत आहे.

आणि ज्या अर्थी, अनुसुची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधीत कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणुन निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले जात असुन , पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्या अर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्य पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) क्र.2 नाशिक यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

**गावांचे नांव-:- मौजे नाशिक तालुका, जिल्हा:- नाशिक**

**प्रकरण क्रमांक - २/१७**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर / गट नंबर | अंदाजित क्षेत्र ( चौ.मी.) |
|---|---|---|
| १ | ७५०,७५१ व ७५५ | १४१०० चौ.मी. |
| एकणु | | १४१०० चौ.मी. |

**अनुसूची- दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नाव :- राज्य शासन व केंद्र शासनाच्या कार्यालयाकरीता

प्रकल्पाच्या कामाचे वर्णन :- राज्य शासन व केंद्र शासनाच्या कार्यालयाकरीता

समाजाला होणारे लाभ: सामाजिक व कल्याणकारी सुविधा उपलब्ध होईल

# जिल्हाधिकारी (भुसंपादन शाखा) नाशिक
# (उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) क्र.२ नाशिक

**अनुसूची - तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

**गावाचे नाव :- मौजे नाशिक तालुका-:- नाशिक जिल्हा :- नाशिक**

| अ.क्र. | भुमापन क्रमांक /गट नंबर | क्षेत्र (हेक्टर मध्ये) |
|---|---|---|
| | लागु नाही | |

**अनुसूची - चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश- लागु नाही**

टिप :- उक्त जमिनीच्या नकाशाचे उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) क्र.2 नाशिक या कार्यालयात निरीक्षण करता येवु शकेल.

दिनांक :- 10/01/2018

ठिकाण:- नाशिक

10/1/18

**( राधाकृष्णन बी. )**
**जिल्हाधिकारी नाशिक**